अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष शिकवणीवर्ग
(Upgradation of merit)

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शाआशा-२००७/प्र.क्र.१९८/का.१३**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३१ मे, २००८**

**पाहा :** १) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय शाआशा-२००७/प्र.क्र.१४/का.१३ दि. २६ सप्टेंबर, २००७

२) केंद्र शासनाचे जनजाती कार्य मंत्रालयाचे पत्र क्र.२२०४५/२/२००७-एज्युकेशन दि.२०/१२/२००७ व दि.२०/०२/२००८

३) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. बीयुडी-२००७/प्र.क्र.८/का.७, दिनांक १९ एप्रिल, २००८.

**शासन निर्णय** - आदिवासी विकास विभागातंर्गत कार्यरत आश्रमशाळेतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष शिकवणी वर्ग या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून दि.२०/०२/२००८ च्या पत्रान्वये १०४ विद्यार्थ्यांसाठी प्राप्त झालेली रक्कम रु.९,३६,०००/- सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यात आली आहे. संदर्भाधीन शासन निर्णय क्र.बीयुडी-२००८/प्र.क्र.८/का.७, दि.१९/४/२००८ अन्वये सदर रक्कम आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे अधिनस्त ठेवण्यात आली आहे.

तद्नुसार अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष शिकवणी वर्ग योजनेकरिता सदर रक्कम कॅश फ्लो प्रमाणे खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

याकरिता होणारा खर्च मागणी क्र. टी-५, २२२५- अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- ०२- अनुसूचित जमातीचे कल्याण- ७९६ -जनजाती क्षेत्र योजना (०२) जनजाती क्षेत्र योजनांतर्गत योजना- विशेष केंद्रीय सहाय्य योजना (०१) (४५) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिकवणी वर्ग ( २२२५ ४०८९ ) ३१, सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर ) करिता सन २००८-०९ करिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२००८०५३१११४१४२००१** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(आ.गु.अस्वले)
उप सचिव

प्रति,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

F:\BACKUP\D\2007\C.R.2007C.R.198.2007

अपर आयुक्त, आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
महालेखापाल (लेखापरीक्षा ), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे स्वीय सहाय्यक
सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती (का.१३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.